जनसंपर्क कक्ष
0 6 MAY 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आभासी वास्तविकता प्रणालीचा मनस्वी आनंद : सतेज पाटील

## शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'चे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क
कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा शासकीय शाळेत शिकणाऱ्या इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयोग होणार आहे. ही प्रणाली प्रत्यक्षात साकारत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे, असे मत आमदार सतेज पाटील यांनी व्यक्त केले आहे.

शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'चे उद्घाटन शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले. नावीन्यपूर्ण योजना, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर अनुदानित प्रकल्पांतर्गत या प्रणालीसाठी तत्कालीन पालकमंत्री आमदार सतेज पाटील यांनी ७५.४० लाखांचा निधी जिल्हा नियोजन मंडळाच्या नावीन्यपूर्ण योजनेतून उपलब्ध करून दिला. या प्रणालीमुळे सध्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तीन विषयांच्या १०४ संकल्पनांचे आधुनिक आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाच्या आधारे सुलभीकरण करण्यात आले आहे. विज्ञानातील अवघड व क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास त्यामुळे सोपे होणार आहे. ही प्रणाली प्रशासनाच्या सहकार्याने जिल्ह्यातील सर्व शासकीय शाळांमधील आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

उपक्रमाची संकल्पना मांडणाऱ्या आणि उपक्रम पूर्ण करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या प्रा. सुधीर देसाई, प्रा. वैशाली भोसले आणि त्यांच्या सहकाऱ्यांना सतेज पाटील यांनी शुभेच्छा दिल्या असून शालेय विद्यार्थ्यांसह इतर क्षेत्रांमध्ये देखील याचा वापर होईल, अशी खात्री वाटते, अशी अपेक्षा व्यक्त केली.

लोकसत्ता

# शाहू महाराजांचे चरित्र रशियन, इटालियन भाषेत

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारी राजा' या चरित्र ग्रंथाचे रशियन व इटालियन भाषेत अनुवाद करण्यात आला आहे.


यां अनुवादाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते शनिवारी केले जाणार आहे. कार्यक्रमास श्रीमंत शाहू महाराज, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत. या ग्रंथाचा रशियन अनुवाद डॉ. मेघा पानसरे व प्रा. तत्यांना बिकवा आणि इटालियन ग्रंथाचा अनुवाद डॉ. आलेसांद्रा कॅन्सललारो यांनी केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 MAY 2023

सकाळ

# राजर्षी शाहूंच्या सामाजिक क्रांतीत सामान्य माणूसच केंद्रबिंदू




## डॉ. जयसिंगराव पवार; रशियन व इटालियन क्रांतीत तोच धागा

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा



डॉ. जयसिंगराव पवार

कोल्हापूर, ता. ५ : ''रशियन राज्य क्रांतीने झारची जुलमी राजवट उलथवून टाकली. जोसेफ मॅझिनीने इटलीच्या स्वातंत्र्य लढ्यात वाहून घेतले. त्याने लंडनमध्ये इटालियन मुलांसाठी शाळा स्थापन करून, इटालियनांवर होणारा जुलूम थांबवला. फ्रेंच राज्य क्रांतीने सरंजामशाही मूल्य व्यवस्थेचा पगडा ओसरून परिवर्तन घडून आले. राजर्षी छत्रपती शाहूराजांनी कोल्हापूर संस्थानात उपेक्षित वर्गाला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. ही त्यांनी केलेली 'सामाजिक क्रांती' होती. या सर्व क्रांतींचा बारकाईने अभ्यास केल्यास, त्या मागे सामान्य माणूस केंद्रबिंदू होता. शाहूराजांनी केलेले कायदे युरोपात त्या काळी अस्तित्वात नव्हते. त्यांच्या कार्याचे मूल्य रशियन व इटालियन लोकांपर्यंत पोचणे जरूरीचे असल्याने या दोन्ही भाषांत शाहू चरित्र अनुवादित केले आहे,'' अशी माहिती ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज 'सकाळ'ला दिली.

पान १० वर »

### डॉ. पवार म्हणतात...

- रशियन व इटलीतील लोकांनी शाहू चरित्र अभ्यासायला हवे
- सामान्य माणसाच्या अस्मिता जागे करणारे शाहूंचे कार्य
- शाहूंची दूरदृष्टी कशी होती, याची माहिती देणारा ग्रंथ
- समतेच्या पायावर आधारलेल्या क्रांती प्रेरणादायी

# राजर्षी शाहूंच्या सामाजिक क्रांतीत सामान्य माणूसच केंद्रबिंदू

» पान १ वरून

'राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारी राजा' चरित्र ग्रंथांचे रशियन व इटालियन अनुवादाचे उद्या (ता. ६) प्रकाशन होत आहे. त्यानिमित्त त्यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी शाहू कार्याचा नेमकेपणाने वेध घेतला.

डॉ. पवार म्हणाले, ''इटली, फ्रेंच, रशियातील राजकीय क्रांती सामान्य लोकांच्या हक्कासाठी होती. या क्रांतींमध्ये मानवमुक्तीच्या दिशेने लढे दिले गेले. शतकानुशतके पिळवणूक झालेल्या लोकांचा तो स्वातंत्र्यासाठी हुंकार होता. शाहूराजांनी कोल्हापूर संस्थानात सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला. त्यांनी स्वातंत्र्याचा संकुचित अर्थ घेतला नाही. सामाजिक न्याय, समता व बंधुतेवर आधारलेले राज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्यासमोर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश होता. त्यांचे कार्य अन्य देशातील क्रांत्यांशी सुसंगत व पूरक आहे. ते शंभर वर्षे पुढे पाहणारे द्रष्टे राजे होते. सामाजिक कायद्यातून त्यांनी समतेचा जागर घातला.''


ते म्हणाले, ''त्यांनी ज्या योजना संस्थानात राबवल्या, त्या त्या काळात युरोपात अस्तित्वात नव्हत्या. त्यांचे कार्य तिथल्या लोकांना कळायला हवे. त्यांनी स्थापन केलेल्या वसतिगृहात माझा वैचारिक पिंड पोसला आहे. मी शाहू प्रॉडक्ट असून, ते विविध भाषांत पोचवणे माझी जबाबदारी आहे. त्यांचे विविध क्षेत्रांतील कार्य केवळ भारतापुरते मर्यादित नाही. देशादेशांत घडलेल्या परिवर्तनवादी चळवळींशी ते निगडित आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कार्याचे मोल जाणून घ्यायला हवे.''

जनसंपर्क कक्ष
0 6 MAY 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराज यांना आज शंभर सेकंद स्तब्धता पाळून अभिवादन

## स्मृती शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त जिल्हाभर विविध उपक्रम

▶ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. ५ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षपूर्तीनिमित्त वैविध्यपूर्ण उपक्रमांतून उद्या (ता. ६) अभिवादन करण्यात येणार आहे. शाहूप्रेमींनी उद्या (ता. ६) सकाळी दहा वाजता शंभर सेकंद स्तब्ध राहून अभिवादन करावे, असे आवाहन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले आहे. यात लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, उद्योजक, तर्ण मंडळांचे प्रतिनिधी, बँकर्स, ग्राहक, बचत गटांचे सदस्य, शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांसह समाजातील सर्व घटकांनी सहभाग घ्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्र व महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीतर्फे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'राजर्षी शाहू छत्रपती : एक समाज क्रांतिकारी राजा' चरित्र ग्रंथाचे प्रकाशन शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी अकरा वाजता होत आहे. राजर्षी शाहू सलोखा मंचतर्फे नर्सरी बागेतील शाहू समाधिस्थळ येथे सकाळी साडेनऊला अभिवादन केले जाणार आहे. दसरा चौकातील शहाजी छत्रपती महाविद्यालयात प्रा. डॉ. अवनीश पाटील 'राजर्षींच्या जीवनातील संघर्ष' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालयातील कर्मवीर वि. रा. शिंदे सभागृहात पान १० वर »

# राजर्षी शाहू महाराज यांना आज शंभर सेकंद स्तब्धता पाळून अभिवादन

» पान १ वरून

सकाळी साडेनऊला हे व्याख्यान आहे. कागल येथील शिवराज्य मंच व वनमित्र संस्थेतर्फे निकाली कुस्त्यांचे मैदान आहे. त्यास यशवंत किल्ल्यातील आखाड्यात दुपारी चार वाजता सुरुवात होईल.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी सांगता व कृतज्ञता पर्वानिमित्त महापालिकेतर्फेही अभिवादन केले जाणार आहे. तसेच ६ मे रोजी सकाळी दहा वाजता महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील विठ्ठल रामजी शिंदे चौकात १०० सेकंद स्तब्ध उभे राहून अधिकारी व कर्मचारी अभिवादन करणार आहेत. सकाळी साडेआठला दसरा चौक येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास व समाधिस्थळावर प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे.

शाहू सेना व महापालिका यांच्यातर्फे एकाच वेळी शंभर शाहूकालीन वास्तूंमध्ये वृक्षारोपण करण्यात येणार आहे. शाहू जन्मस्थळ, खासबाग मैदान, साठमारी, जिल्हाधिकारी कार्यालय, शाहू मिल, पाण्याचा खजिना, कळंबा तलाव यांसह शंभर शाहूकालीन वास्तूंच्या परिसरात वृक्षारोपण केले जाईल. उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन शाहू सेनेचे जिल्हाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी केले आहे. शहरातील प्राथमिक शाळांमध्ये शाहूचरित्राचे वाटप केले जाणार असून, या उपक्रमाची सुरुवात उद्या (ता. ६) शाहू समाधी स्थळ येथे मालोजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत होणार आहे.

### शाहू मिलचा भोंगा दिवसात चारदा वाजणार

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची आठवण असलेल्या शाहू मिलमधील भोंगा उद्यापासून (ता. ६) दिवसभरात चारवेळा वाजणार आहे. त्यासाठी मावळा ग्रुप व राजर्षी छत्रपती शाहू स्मृती व विचार जतन समितीने सातत्याने पाठपुरावा केला होता. तो कायमस्वरूपी वाजत राहावा, यासाठी उच्चशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून प्रयत्न केले. त्यातून मिलमधील जागा उपलब्ध झाली.

वीजपुरवठाही करण्यात आला. टायमर लावला असून दिवसभरात चारवेळा तो आपोआप वाजणार आहे. सकाळी दहा, अकरा, दुपारी तीन व सायंकाळी सहा अशा वेळी भोंगा वाजत राहणार आहे. शनिवारी (ता. ६) सकाळी अकरा वाजता मंत्री पाटील व श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या उपस्थितीत भोंगा वाजवला जाणार आहे.



कोल्हापूर : येथील शाहू मिलमध्ये बसवण्यात आलेला भोंगा.

06 MAY 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा सोमवारपासून

## विविध २६ अभ्यासक्रम; ६४४९ विद्यार्थ्यांची नोंदणी

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा सोमवार (ता. ८) ते गुरुवार (ता. ११) दरम्यान होणार आहेत. विविध २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी ६४४९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.



एकूण १६ केंद्रांवर परीक्षा होणार आहे. त्यात कोल्हापूरमध्ये ५, सांगलीत ३, सातारामध्ये ६, तर सोलापूर आणि बेळगावमध्ये प्रत्येकी एक परीक्षा केंद्र असणार आहे. त्याठिकाणी सकाळी १०.३० ते दुपारी १२, दुपारी १ ते २.३० आणि दुपारी ३.३० ते सायंकाळी ५ या सत्रांमध्ये परीक्षा होईल. एम. एस्सी., केमिस्ट्री, मॅथेमेटिक्स, मायक्रोबायोलॉजी, झूलॉजी, फिजिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एम. एम. मास कम्युनिकेशन, एमसीए, एमजेसी., बीजेसी, अशा विविध २६ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यात येणार आहे. त्यात सोमवारी ५, मंगळवारी ११, बुधवारी ४ आणि गुरुवारी ६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन स्वरूपात होतील. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी येताना हॉल तिकीट आणि ओळखपत्र (व्होटरकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन यापैकी एक) सोबत आणणे बंधनकारक आहे. दरम्यान, या परीक्षांची तयारी पूर्ण झाली असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

### वैद्यकीय प्रवेशाची 'नीट' परीक्षा उद्या

■ नॅशनल टेस्टिंग एजन्सीतर्फे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची नीट-यूजीसी परीक्षा रविवारी (ता. ७) दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजून २० मिनिटे या वेळेत घेण्यात येणार आहे. कोल्हापुरातील विविध नऊ केंद्रांवर परीक्षा होईल. ऑफलाईन स्वरूपात परीक्षा होणार आहे. या परीक्षेत इयत्ता अकरावी, बारावीच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र-जैवतंत्रज्ञान याविषयांवरील १८० बहुपर्यायी प्रश्न असणार आहेत. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून ७,२८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

Times of India

# CLOUDY, BUT NO RAIN

Rahul Gayakwad



Clouds gather in the sky over the main building of Shivaji University, Kolhapur. The district had a yellow alert from IMD for Friday, but there was no rainfall